| | |
|---|---|
| दाखल तारीख | २१/११/२०२२ |
| नोंदणी तारीख | २१/११/२०२२ |
| निकाल तारीख | ०८/१०/२०२४ |
| कालावधी | वर्ष ०१ म.१० दि. १७ |

# नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान अधिनियम, १९७२

(पीठासिन अधिकारी - श्री सचिन सू. पाटील)

**प्रकरण पी.जी.ए. क्र. ४३८/२०२२**

**CNR No. MHLC270005812022**

**नि.क्र.ओ -०४**

श्री प्रदीप भिमराव देशमुख
वय - ६८ वर्षे, कामधंदा - सेवानिवृत्त,
राहणार - मांगीलाल प्लॉट, अमरावती,
तहसिल-जिल्हा-अमरावती. .... **अर्जदार**

**विरूध्द**

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती. ... **गैरअर्जदार**.

**विधीज्ञ** : श्री आर. व्ही. भुजाडे, विधीज्ञ, अर्जदारातर्फे
श्री ए. व्ही. पाटील, विधीज्ञ, गैरअर्जदारातर्फे.

## न्यायनिर्णय

(दिनांक ०८/१०/२०२४)

अर्जदाराने सदरचा अर्ज उपदान प्रदान कायदा १९७२ कलमचे ७(४-ब) अन्वये उपदानाची रक्कम मिळण्याकरीता केला आहे.

अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे.

२. अर्जदार गैरअर्जदार यांचेकडे दिनांक ०४/११/१९७८ पासुन 'अधिक्षक' म्हणून नोकरीला होते. ते दिनांक ३१/१०/२०१२ रोजी सेवानिवृत्त झालक. त्यांचा शेवटच्या महिन्यातील पगार रू. ४८,६०७/- होता. त्यांनी एकूण ३४ वर्षे सेवा केली. त्यानुसार ते रक्कम रूपये ७,९३,१८७/- इतकी रक्कम उपदान म्हणून मिळण्यास पात्र आहेत. परंतु गैरअर्जदाराने त्यांना केवळ रू.३,८७,९१५/- इतकी उपदानाची रक्कम अदा केली. उर्वरित उपदानाची रक्कम रू. ४,०५,२७२/- ते मिळण्यास पात्र आहे. सदरची रक्कम मागणीकरून देखील गैरअर्जदाराने ती अदा केली नाही. म्हणून सदरचा अर्ज केला आहे.

३. न्यायालयाची नोटीस मिळाल्यानंतर गैरअर्जदार न्यायालयात हजर झाले. गैरअर्जदार यांनी नि.क्र.सी-२ अन्वये कैफियत सादर केली गैरअर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदार दिनांक ०४/११/१९७८ पासुन ते दिनांक ३१/१०/२०१२ पर्यंत नोकरीवर होते. तसेच त्यांनी एकूण ३४ वर्षे सेवा केली. शासन निर्णयाप्रमाणे अर्जदारास केवळ रक्कम रू. ३,८७,९१५/- इतकी उपदानाची रक्कम ते देणे लागतात. त्याप्रमाणे ती त्यांनी अदा केली आहे. अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित उपदानाची रक्कम ते देणे लागत नाही. अर्ज मुदतीत दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा.

४. अर्जदार व गैरअर्जदार यांनी त्यांचे अर्ज व कैफियतीमध्ये नमुद केलेल्या कथनांच्या अनुषंगाने नि.क्र.ओ-३ अन्वये मुद्दे काढण्यात आले. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार यांचा पुरावा नोंदविण्यात आला.

... ३/-

दोन्ही पक्षकारांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. त्यानुसार काढण्यात आलेल्या सर्व मुद्दांवरील माझे निर्णय मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| | मुद्दे | निर्णय |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराने अर्जदाराची उपदानाच्या रकमेची मोजणी योग्यरित्या केली नसल्याचे व त्यांना पुरेशी उपदानाची रक्कम अदा केली नसल्याची बाब अर्जदार सिध्द करतात काय ? | मुद्दा उरत नाही |
| २. | अर्ज चालण्यास पात्र आहे काय व तो मुदतीत दाखल करण्यात आला आहे काय ? | मुद्दा उरत नाही |
| ३. | अर्जदार मागणी केल्याप्रमाणे उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र आहेत काय ? | मुद्दा उरत नाही |
| ४. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. अर्जदार श्री प्रदीप भिमराव देशमुख यांनी नि.क्र.यु-८ अन्वये पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराने त्यांचे हकीकतीचे समनार्थ खालील कागदोपत्री पुराव्यांचा आधार घेतला आहे.

१. उपदान आदेश नि.क्र.यु-११

२. गणक तक्ता नि.क्र.यु-१२

३. आधार कार्ड नि.क्र.यु-१.

गैरअर्जदारातर्फे कोणताही पुरावा देण्यात आला नाही.

**मुद्दा क्र.१ ते ४** :-

६. अर्जदार श्री प्रदीप भिमराव देशमुख यानी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे कथित केले आहे की, गैरअर्जदार यांचेकडे दिनांक

०४/११/१९७८ पासुन 'अधिक्षक' म्हणून नोकरीला होते. ते दिनांक ३१/१०/२०१२ रोजी सेवानिवृत्त झालक. त्यांचा शेवटच्या महिन्यातील पगार रू.४८,६०७/- होता. त्यांनी एकूण ३४ वर्षे सेवा केली. त्यानुसार ते रक्कम रूपये ७,९३,१८७/- इतकी रक्कम उपदान म्हणून मिळण्यास पात्र आहेत. परंतु गैरअर्जदाराने त्यांना केवळ रू. ३,८७,९१५/- इतकी उपदानाची रक्कम अदा केली. उर्वरित उपदानाची रक्कम रू.४,०५,२७२/- ते मिळण्यास पात्र आहे. सदरची रक्कम मागणीकरून देखील गैरअर्जदाराने ती अदा केली नाही. प्रकरणातील चौकशी दरम्यान अर्जदाराने नि.क्र.यु-१४ अन्वये अर्ज त्यांना पुढे चालवण्याचा नाही व ते प्रकरण मागे घेत असल्याची पुर्सीस दिली. त्यानुसार अर्जदार उपदानाची मागणी सोडून देत असल्याचे दिसून येते. अर्जदाराने अर्जात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदाराकडुन त्यांना यापुर्वी उपदान म्हणून रक्कम रू.३,८७,९१५/- इतकी मिळाल्याचे दिसून येते. अर्जदाराने ते उर्वरित रक्कम रू.४,०५,२७२/- इतकी उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र असल्याबाबत कोणताही पुरावा सादर केला नाही. त्यामुळे प्रकरण निकाली काढणे योग्य होईल. म्हणून मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

. अर्ज नामंजुर करण्यात आला.

sd/-

अमरावती (सचिन सू. पाटील)
दिनांक : ०८/१०/२०२४ नियंत्रण अधिकारी, तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, अमरावती

... /-